# <u>वृत्तपत्रीय खुलासा</u>

नुकत्याच प्रसिध्द झालेल्या महालेखापाल (कॅग) यांच्या अहवालातील महानिर्मितीसंबंधित शेऱ्यांवर आधारित बातम्या गेल्या काही दिवसांपासून राज्यातील काही वृत्तपत्रांत अधूनमधून प्रसिध्द होत आहेत. त्या अनुषंगाने सदर बाबतीत महानिर्मितीचा पुढीलप्रमाणे खुलासा आहे :-

१) पुनर्रचनेनंतर जून २००५ पासून वीज क्षेत्रात नियामक आयोगाचा अंमल सुरु झाल्यापासून महानिर्मितीच्या बाबतीत केला गेलेला अत्यंत विपरीत पक्षपात व आव्हानात्मक परिस्थितीत व इतर अनेक समस्यांना तोंड देत महानिर्मितीने राज्यातील ग्राहकांना सर्वांत रास्त व स्वस्त दराने वीज पुरवठा केला आहे. महानिर्मितीला ARR (वार्षिक महसुली गरज) या एकाच माध्यमातून राज्य वीज आयोगाकडून महसुली खर्च मंजूर करुन घ्यावा लागतो. तथापि गेल्या काही वर्षांतील अनुभवानुसार, महानिर्मितीच्या सनदशीर व रास्त खर्चाबाबत वीज आयोगाच्या भूमिकेत सातत्याचा अभाव आहे. आयोगाने मात्र अतिशय अव्यवहारी व चुकीच्या अशा निकषांवर आधारित विजेचे दर महानिर्मितीसाठी निश्चित केले. व्यवहार्य व प्रत्यक्ष जमाखर्च विचारात न घेतल्यामुळे दर वर्षी जमाखर्चातील तफावत वाढत गेली. गेल्या ३ वर्षांतील ही तफावत सुमारे १९६८ कोटी रुपये इतकी प्रचंड आहे. त्यामुळे महानिर्मितीने अपिलीय प्राधिकरणाकडे दाद मागितली. अपिलीय प्राधिकरणाने महानिर्मितीच्या योग्य, रास्त व न्याय्य अडचणींचा विचार करुन बहुतेक मुद्यांवर महानिर्मितीच्या बाजूने निकाल दिला.

२) ग्राहकहिताच्या दृष्टीकोनातून महानिर्मितीचे वीज दर हे मेसर्स. टाटा पॉवरच्या वीजदरापेक्षा १.८३ पैसे एवढे कमी आहेत. तसेच मेसर्स. रिलायन्स इन्फ्राच्या वीजदरापेक्षा ५४ पैसे एवढे कमी आहेत. तरीदेखील आयोगाकडून ही बाब दुर्लक्षित करण्यात येते.

३) खराब, ओला आणि कमी दर्जाचा कोळसा यामुळे ५५१५.८५ कोटी रुपयांची आकडेवारी सदर वृत्तात दाखविली आहे. याबाबत महानिर्मिती स्पष्ट करु इच्छिते की, महानिर्मितीला प्राप्त होणारा बहुतांशी कोळसा (सुमारे ६३%) हा वेस्टर्न कोल फिल्ड लिमिटेड या उपक्रमाकडून पुरविला जातो व या उपलब्ध देशी कोळशाची प्रतवारी निकृष्ट (ई/एफ) दर्जाची असल्याने साहजिकच या कोळशाचा उष्मांक पुरेसा नसल्याने नाईलाजापोटी तो जास्त प्रमाणात जाळावा लागतो. त्यामुळे इंधन कोळशासाठी जास्त खर्च होतो. शिवाय वीजउत्पादनावर विपरीत परिणाम झाल्याने आयोगाने निर्धारित केलेले कामगिरीचे निकष पूर्ण करण्यास समस्या येतात व परिणामी आयोगाकडून त्याप्रमाणात महसूल नाकारण्यात येतो. मुळात हे निकषच वास्तवदर्शी नसल्याने वृत्तात नमूद केल्याप्रमाणे विजेची विक्री ७,००० कोटी रुपयांनी कमी होऊन ३९७.६९ कोटी रुपये नुकसान झाले, असे निष्कर्ष काढणे पूर्णतः चुकीचे तथा दिशाभूल करणारे ठरेल.

४) महानिर्मितीच्या कामगिरीचे लेखापरीक्षण करताना मात्र मा. महालेखापाल (कॅग) यांनी वीज आयोगाने निर्धारित केलेले कामगिरीचे निकषच गृहित धरल्याचे दिसते. मा. महालेखापाल (कॅग) यांच्या अहवालात नमूद केलेली आकडेवारी या निकषांवर गृहित असल्याचे दिसते. तथापि, हे निकष हे वस्तुस्थितीला धरुन नसल्याने ते अवास्तव आहेत. याबाबत महानिर्मितीने वेळोवेळी आयोगाकडे तसेच अपिलीय प्राधिकरणाकडे दाद मागितलेली आहे. त्यामुळे एकूणच कामगिरीचे निकष व त्यानुसार मंजूर करण्यात आलेला खर्च आणि महानिर्मितीचे झालेले नुकसान याकडे एका वेगळ्या वास्तववादी दृष्टीकोनातून बघणे आवश्यक वाटते.

५) राज्यात पाच वर्षांत ५२१० मेगावॅट वीजनिर्मिती क्षमता वाढ अपेक्षित असताना प्रत्यक्षात फक्त ६२५ मेगावॅट इतकीच झाली असे सदर वृत्तात नमूद केले असले तरीही त्यातील बहुतांशी प्रस्तावित प्रकल्प हे खाजगी उद्योग संस्थांचे होते हे महानिर्मिती स्पष्ट करु इच्छिते. यातील बहुतांशी खाजगी वीज प्रकल्पांना भूसंपादन प्रक्रियेत अनेक अडथळे आल्याने हे प्रकल्प अजून वास्तवात साकार होऊ शकले नाहीत. तथापि, खाजगी वीज प्रकल्पांशी महानिर्मितीचा कोणताही थेट संबंध नाही. महानिर्मितीचे परळी व पारस येथील २५० मेगावॅटचे प्रत्येकी दोन संच कार्यान्वित झाले असून त्याद्वारे १००० मेगावॅट इतकी स्थापित क्षमतेत वाढ झाली आहे. तसेच चंद्रपूर (१००० मेगावॅट), खापरखेडा (५०० मेगावॅट), भुसावळ (१००० मेगावॅट), परळी (२५० मेगावॅट), कोराडी (१९८० मेगावॅट) याप्रमाणे अन्य प्रकल्पस्थळीदेखील वेगाने काम सुरु आहे.

६) परळी व पारस येथील प्रकल्प पूर्ण करताना मेसर्स. भेलकडून मुख्य संयंत्र सामुग्रीचा पुरवठा होताना झालेल्या विलंबामुळे तसेच सामुग्रीच्या दर्जाबाबत काही समस्या उद्‌भवल्याने हे प्रकल्प नियोजित वेळापत्रकानुसार पूर्ण करता आले नाहीत. अन्य राज्यातील वीज प्रकल्पांनादेखील मेसर्स. भेलचा अशाच प्रकारचा अनुभव असून तिथेही प्रकल्पांना विलंब होत आहेत. प्रकल्पपूर्तीस विलंब झाल्यामुळे खर्चदेखील वाढला व या विलंबास महानिर्मिती जबाबदार नसताना देखील त्याचा भुर्दंड महानिर्मितीला सोसावा लागला.

७) महानिर्मिती ही कोणताही व्यावसायिक फायदा घेण्याच्या हेतूने प्रेरित नसून राज्यातील जनतेला रास्त व परवडणाऱ्या दरात वीजनिर्मिती करण्यासाठी प्रयत्नशील आहे. सामाजिक उत्तरदायित्वाच्या भावनेने कार्यरत असलेल्या महानिर्मितीला जाणीवपूर्वक सतत अडचणीत आणण्याचे व तोट्यात ढकलण्याचे प्रयत्न होताना दिसत आहेत. याउलट काही खाजगी कंपन्यांकडून प्रति युनिट चार रुपयापेक्षा जास्त दराने वीज खरेदी करण्यासाठी नियामक आयोगाकडून मंजूरी देण्यात येत आहेत.

याबाबत असेही नमूद करणे आवश्यक ठरते की, महाराष्ट्रातील जनतेसाठी व वीजग्राहकांसाठी महानिर्मिती कंपनीमध्ये महाराष्ट्र शासनाने १००% गुंतवणूक करुन जास्तीत जास्त वीजनिर्मिती करण्याचे प्रयत्न केले आहेत व करण्यात येत आहेत. त्यात अवास्तव नफा मिळविण्याचा कोणताही उद्देश नाही, तथापि, खाजगी कंपन्या मात्र विविध मार्ग अवलंबून यातून जास्तीत जास्त नफा कमविण्याच्या उद्देशाने काम करीत आहे. महानिर्मिती कंपनीने स्वस्त व मुबलक प्रमाणात वीजनिर्मिती करुन महाराष्ट्रातील जनतेचे व ग्राहकांचे हित जोपासण्याचा योग्य मार्गाने प्रयत्न केला आहे. तथापि, असे निदर्शनास येत आहे की, विजेच्या व्यापारातील सद्यस्थिती लक्षात घेता, कार्यक्षमतेच्या तसेच स्पर्धेच्या नांवाखाली महागड्या विजेची खरेदी व्हावी, यासाठी काही अनिष्ट प्रवृत्तींचे नियोजनबध्द प्रयत्न सुरु आहेत. असे प्रयत्न राज्यातील वीजग्राहकांच्या हितास बाधक असून त्यातून ग्राहकांना प्रचंड वीज दरवाढीस सामोरे जावे लागेल, अशी शक्यता वीजक्षेत्रातील जाणकार मंडळीकडून करण्यात येत आहे.

***सोबत पूरक सविस्तर माहिती जोडली आहे. (एकूण ५ पाने)**

## सविस्तर वृत्तपत्रीय खुलासा

नुकत्याच प्रसिध्द झालेल्या महालेखापाल (कॅग) यांच्या अहवालातील महानिर्मितीसंबंधित शेऱ्यांवर आधारित बातम्या गेल्या काही दिवसांपासून राज्यातील काही वृत्तपत्रांत अधूनमधून प्रसिध्द होत आहेत. त्या अनुषंगाने सदर बाबतीत महानिर्मितीचा पुढीलप्रमाणे खुलासा आहे :-

१) पुनर्रचनेनंतर जून २००५ पासून वीज क्षेत्रात नियामक आयोगाचा अंमल सुरु झाल्यापासून महानिर्मितीच्या बाबतीत केला गेलेला अत्यंत विपरीत पक्षपात व आव्हानात्मक परिस्थितीत व इतर अनेक समस्यांना तोंड देत महानिर्मितीने राज्यातील ग्राहकांना सर्वांत रास्त व स्वस्त दराने वीज पुरवठा केला आहे. आयोगाने मात्र अतिशय अव्यवहारी व चुकीच्या अशा निकषांवर आधारित विजेचे दर महानिर्मितीसाठी निश्चित केले. खालील तक्त्यांवरुन गेल्या ३ वर्षांत आयोगाकडे मागणी केलेले दर, आयोगाने मंजूर केलेले दर व प्रत्यक्ष खर्चानुसार आलेले दर याचा तपशील खालीलप्रमाणे आहे

### महानिर्मितीला ARR अंतर्गत मागितलेली रक्कम - मिळालेली रक्कम यातील तफावत दर्शविणारा तक्ता

| वर्ष | एकक | महानिर्मितीने ARR अंतर्गत मागितलेली रक्कम | आयोगाकडून प्रत्यक्षात प्राप्त झालेली रक्कम | तफावत |
|---|---|---|---|---|
| **२००८-०९** | कोटी (रु.) | ९४३९ | ८७५५ | ६८४ |
| | दशलक्ष युनिटस् | ४४४३३ | ४८१९२ | ३७५९ |
| | **रुपये प्रति युनिट** | **२.१२** | **१.८२** | **०.३१** |
| **२००९-१०** | कोटी (रु.) | १०७५७ | १००१७ | ७४० |
| | दशलक्ष युनिटस् | ४३९५५ | ४८९०२ | ४९४७ |
| | **रुपये प्रति युनिट** | **२.४५** | **२.०५** | **०.४०** |
| **२०१०-११** | कोटी (रु.) | १११७५ | १०६३१ | ५४४ |
| | दशलक्ष युनिटस् | ४५१२० | ४८९०२ | ३७८२ |
| | **रुपये प्रति युनिट** | **२.४८** | **२.१७** | **०.३०** |

वर दर्शविल्याप्रमाणे, व्यवहार्य व प्रत्यक्ष जमाखर्च विचारात न घेतल्यामुळे दरवर्षी जमाखर्चातील तफावत वाढत गेली. त्यामुळे महानिर्मितीने अपिलीय प्राधिकरणाकडे दाद मागितली. अपिलीय प्राधिकरणाने महानिर्मितीच्या योग्य, रास्त व न्याय्य अडचणींचा विचार करुन बहुतेक मुद्यांवर महानिर्मितीच्या बाजूने निकाल दिला. तथापि, सदर प्रक्रियेत २-३ वर्षांचा कालावधी गेला. म्हणजेच सन २००५-०६ ते २००७-०८ मधील खर्चाचा रु. ७६४ कोटींचा फरक महानिर्मितीस मार्च २०१० मध्ये प्राप्त झाला, तर सन २००८-०९ पासून पुढील कालावधीतील त्रुटींबाबत अपिलीय प्राधिकरणाने अलीकडेच निकाल दिला असून सदर त्रुटीची रक्कम पुढील ३ महिन्यांत भरुन निघेल अशी अपेक्षा आहे. वर्ष २०१०-११ मध्ये आयोगाने आदेश देताना लेखांकनात

केलेल्या चुकीमुळे वर्षभरात कमी मिळालेला रुपये ४३२ कोटींची भरपाई वर्षांच्या अखेरीस ३१ मार्च २०११ रोजी आयोगाने दिली.

**महानिर्मितीच्या मुख्य समस्या पुढीलप्रमाणे आहेत :**

२) महानिर्मितीचे बहुतांशी वीजनिर्मिती संच हे २५ वर्षांहूनही जुने आहेत. त्यांची कार्यक्षमता आयुर्मानानुसार कमी होऊन सुध्दा राज्यातील विजेची गरज लक्षात घेता हे संच चालविण्यासाठी जास्त खर्च येत असूनही महानिर्मितीने राज्यातील जनतेची सोय लक्षात घेऊन हे जुने संच चालविले. दरम्यानच्या काळात राज्यात अपेक्षित असलेले खाजगी वीज प्रकल्प भूसंपादन व अन्य समस्यांमुळे मार्गी न लागल्याने नाईलाजाने महानिर्मितीला नुकसान सोसून हे संच चालवावे लागले. तथापि, एकूण आर्थिक परिस्थिती लक्षात घेऊन शेवटी यातील सुमारे ३५ ते ४० वर्षे आयुष्यमान असलेले काही जुने संच बंद करावे लागले. कारण जुने संच चालविण्यासाठी येणारा वाढीव खर्च आयोगाकडून सातत्याने नामंजूर करण्यात आला. महानिर्मितीला प्राप्त होणारा बहुतांशी कोळसा (सुमारे ६३%) हा वेस्टर्न कोल फिल्ड लिमिटेड या उपक्रमाकडून पुरविला जातो व या देशी कोळशाची प्रतवारी निकृष्ट (ई/एफ) दर्जाची असल्याने साहजिकच या कोळशाचा उष्मांक पुरेसा नसल्याने जास्त प्रमाणात तो जाळावा लागतो व त्यातील राखेचे प्रमाणही जास्त असते. तसेच पावसाळ्यात बहुतांशी वीजकेंद्रांना ओल्या कोळशाची समस्या जाणवत असल्याने वीजउत्पादनावर विपरीत परिणाम होतो. हा कोळसा मातीमिश्रित व चिकट असतो. त्यामुळे एकीकडे इंधन खर्च जास्त करावा लागत असूनही वीजउत्पादनावर विपरीत परिणाम होतो. त्यामुळे आयोगाने निर्धारित केलेले वीज संचांचे कामगिरीचे अवाजवी निकष (उदा. पी.एल.एफ., भारांक, उपलब्धता, इ.) पाळता येणे शक्य होत नाही. हे निकष पाळता न येण्यामागची महानिर्मितीची रास्त भूमिका लक्षात न घेता आयोग वारंवार सदर इंधन खर्च व इतर खर्च नामंजूर करत असल्याने महानिर्मितीचे सतत दुहेरी नुकसान होत आहे.

बहुतांश संचांचे उष्मांक आवश्यकता (बॉयलर डिझाईननुसार) यांत फार मोठी तफावत आहे व ते खालील तक्त्यांवरुन स्पष्ट होते.

| **औष्णिक वीज केंद्राचे नांव** | **बॉयलर डिझाईनप्रमाणे आवश्यक उष्मांक (किलो कॅलरीज / किला)** | **वीजकेंद्राला प्राप्त झालेला उष्मांक** | |
|---|---|---|---|
| | | **२००८-०९** | **२००९-१०** |
| नाशिक औ.वि. केंद्र | ५२०५ | ३२५५ | ३०६० |
| चंद्रपूर औ.वि. केंद्र | ३९२२ | ३१०२ | ३१७८ |
| खापरखेडा औ.वि. केंद्र | ३९५० | ३२१८ | ३१६४ |
| परळी औ.वि. केंद्र | ४४२५ | ३८२९ | ३९४७ |
| भुसावळ औ.वि. केंद्र | ४८९३ | ३११३ | ३१७३ |
| पारस औ.वि. केंद्र | ३४४८ | ३६५३ | ३४४८ |
| कोराडी औ.वि. केंद्र | ४७४० | ३६०० | ३८३१ |

तथापि, देशी कोळसा स्वस्त असल्याने तो जाळूनच वीजनिर्मिती उद्दिष्ट साध्य करावे लागते. त्याउलट खाजगी वीजनिर्मिती कंपनी उदा. टाटा पॉवर, रिलायन्स हे मोठ्या प्रमाणावर कोळसा आयातीत करतात व आयातीत कोळशाचे दर जास्त असल्याने त्याचे वीजनिर्मिती दरही जास्त असतात.

**राज्यातील वीजउत्पादकांचा वीजदराचा तुलनात्मक तक्ता (वर्ष २०१०-११)**

| वर्ष | वीजकंपनी | महानिर्मितीने ARR अंतर्गत मागितलेली रक्कम (रुपये प्रति युनिट) | आयोगाकडून प्रत्यक्षात प्राप्त झालेली रक्कम (रुपये प्रति युनिट) |
|---|---|---|---|
| २०१०-११ | महानिर्मिती | २.४८ | २.१७ |
| | रिलायन्स इन्फ्रा | ३.१३ | २.७१ |
| | टाटा पॉवर | ४.३० | ४.०० |

वरील तक्त्यावरुन महानिर्मितीचे वीज दर हे मेसर्स. टाटा पॉवरच्या वीजदरापेक्षा १.८३ पैसे एवढे कमी आहेत. तसेच मेसर्स. रिलायन्स इन्फ्राच्या वीजदरापेक्षा ५४ पैसे एवढे कमी आहेत, हे स्पष्ट होते. तरीदेखील आयोगाकडून ही बाब दुर्लक्षित करण्यात येते.

३) महानिर्मितीला ARR (वार्षिक महसुली गरज) या एकाच माध्यमातून राज्य वीज आयोगाकडून महसुली खर्च मंजूर करुन घ्यावा लागतो. तथापि गेल्या काही वर्षांतील अनुभवानुसार, महानिर्मितीच्या सनदशीर व रास्त खर्चाबाबत वीज आयोगाच्या भूमिकेत सातत्याचा अभाव आहे. कामगिरीचा ज्या निकषावर आयोगाने महानिर्मितीला महसूल मंजूर केला आहे ते निकषच मुळात अवास्तव, वस्तुस्थिती लक्षात न घेता निश्चित केलेले असल्याने दरवर्षी आयोगाच्या निर्णयामुळे महानिर्मितीला फार मोठे आर्थिक नुकसान सहन करावे लागत आहे. महानिर्मितीच्या कामगिरीतील सुधारणा सीपीआरआय च्या शिफारशींची प्रत्यक्ष अंमलबजावणी केल्यानंतरच व त्यानुसार भांडवली गुंतवणूक केल्यानंतरच शक्य होईल, याचा आयोगाने विचार केला नाही. इतकेच नव्हे तर गेल्या वर्षी चंद्रपूरला पाणी टंचाईमुळे वीजनिर्मितीवर मोठा विपरीत परिणाम झाला होता, या नैसर्गिक आपत्तीचादेखील विचार झाला नाही. तसेच घसारा, घसाऱ्यापोटी उचल रक्कम, दीर्घमुदतीच्या कर्जावरील तसेच खेळत्या भांडवलावरील व्याज, महसुली समायोजन याबाबतदेखील वीजआयोगाकडून महानिर्मितीवर सातत्याने अन्याय करण्यात आला आहे. याबाबत वेळोवेळी महानिर्मितीला अपिलीय प्राधिकरणाकडे (ॲपलेट) दाद मागून न्याय मिळवावा लागला आहे. परंतु, या सर्व प्रक्रियेत सुमारे २-३ वर्षांचा विलंब झाल्याने ॲपटेलच्या हस्तक्षेपानंतर देखील न्याय महसूल वेळेवर प्राप्त होण्यात महानिर्मितीचे मोठे आर्थिक नुकसान होत आहे. सद्यस्थितीत देखील महानिर्मितीच्या अशा काही याचिका ॲपटेलकडे प्रलंबित आहेत. वस्तुतः महानिर्मितीच्या वीजनिर्मितीतील स्थिर आकार हा राज्यातील अन्य वीज उत्पादनांच्या तुलनेत सर्वात कमी आहे, असे असतानाही आयोगाकडून वास्तव स्थिर आकार अन्यायकारकरित्या नामंजूर करण्यात आला आहे.

४) चांगला कोळसा जास्तीत जास्त प्रमाणात प्राप्त व्हावा यासाठी गेल्या सुमारे २ वर्षांपासून एस.ई.सी.एल. व एस.सी.सी.एल. यांसारख्या अन्य कोळसा पुरवठादारांशी इंधन करार करण्यासाठी महानिर्मितीने सर्वतोपरी प्रयत्न केले. कोळसाचा दर्जा निर्धारित करण्यासाठी (उदा. कोळश्यातील दगडांचे, शेलचे प्रमाण व साईज) सदर इंधन करारातील जाचक अटी शिथिल करणेबाबत महानिर्मितीने वारंवार विनंती करुनही कोळशाच्या प्राप्त दर्जामध्ये सुधारणा न झाल्याने महानिर्मितीला मोठे आर्थिक नुकसान सोसावे लागले. तसेच प्रमाणापेक्षा जास्त कोळशाचा वापर करावा लागला.

५) वर्ष २००५ पासून वीजनिर्मितीच्या स्थापित क्षमतेत वाढ करणेसाठी महानिर्मितीने मध्यम मुदतीचे व दीर्घ मुदतीचे नियोजन करुन टप्पानिहाय प्रकल्प उभारणीचे काम गतीने सुरु केले. यांपैकी परळी व पारस येथील २५० मेगावॅटचे प्रत्येकी दोन संच कार्यान्वित झाले असून त्याद्वारे १००० मेगावॅट इतकी स्थापित क्षमतेत वाढ झाली आहे. तसेच चंद्रपूर (१००० मेगावॅट), खापरखेडा (५०० मेगावॅट), भुसावळ (१००० मेगावॅट), परळी (२५० मेगावॅट), कोराडी (१९८० मेगावॅट) याप्रमाणे अन्य प्रकल्पस्थळीदेखील वेगाने काम सुरु आहे.

६) परळी व पारस येथील प्रकल्प पूर्ण करताना मेसर्स. भेलकडून मुख्य संयंत्र सामुग्रीचा पुरवठा होताना झालेल्या विलंबामुळे तसेच सामुग्रीच्या दर्जाबाबत काही समस्या उद्‌भवल्याने हे प्रकल्प नियोजित वेळापत्रकानुसार पूर्ण करता आले नाहीत. याबाबत महानिर्मितीने मेसर्स. भेलशी सातत्याने पाठपुरावा केला होता. मेसर्स. भेल ही वीज संयंत्रांचा पुरवठा करणारी एकाधिकारशाही असलेली कंपनी असल्याने व त्यांचेकडे देशातील इतर राज्यांतील वीज प्रकल्पांना सामुग्री पुरविण्याचे कामदेखील असल्याने सामुग्री प्राप्त करण्यात विलंब झाला. अन्य राज्यातील वीज प्रकल्पांनादेखील मेसर्स. भेलचा अशाच प्रकारचा अनुभव असून तिथेही प्रकल्पांना विलंब होत आहेत. प्रकल्पपूर्तीस विलंब झाल्यामुळे खर्चदेखील वाढला व या विलंबास महानिर्मिती जबाबदार नसताना देखील त्याचा भुर्दंड महानिर्मितीला सोसावा लागला. या प्रकल्प उभारणीच्या वाढीव खर्चापोटी घेतलेल्या कर्जावरील व्याजाची रक्कम जी सुमारे ४०० कोटी रुपये होती ती आयोगाने महानिर्मितीला नामंजूर केली. वीजप्रकल्प उभारणीत विलंब झाला असली तरीही महानिर्मितीने सादर केलेली त्यामागील रास्त कारणे, मेसर्स. भेलची एकाधिकारशाही, पुरवठा करारातील तरतुदी, महानिर्मितीच्या नियंत्रणाबाहेरील तत्कालिन परिस्थिती इ. बाबी संपूर्णतः दुर्लक्ष करुन आयोगाने घेतलेली ही भूमिका घेतली. प्रकल्प पूर्ण होण्यास ४२ महिन्यांचा कालावधी लागला असूनही आयोगाने भांडवली खर्चाच्या मंजूरीसाठी फक्त ३२ महिन्यांचा कालावधीच गृहित धरला. यानंतर अपिलीय लवादाच्या निर्णयानुसार वाढीव खर्चापैकी ५०% भुर्दंड महानिर्मितीला नाहक सोसावा लागला.

७) राज्यात पाच वर्षांत ५२१० मेगावॅट वीजनिर्मिती क्षमता वाढ अपेक्षित होती असे सदर वृत्तात नमूद केले असले तरीही त्यातील बहुतांशी प्रकल्प हे खाजगी उद्योग संस्थांचे होते. यातील बहुतांशी खाजगी वीज प्रकल्पांना भूसंपादन प्रक्रियेत अनेक अडथळे आल्याने हे प्रकल्प अजून वास्तवात साकार होऊ शकले नाहीत. तथापि, खाजगी वीज प्रकल्पांशी महानिर्मितीचा कोणताही थेट संबंध नाही. महानिर्मितीचे सर्व नियोजित प्रकल्प हे प्रकल्पस्थळी प्रत्यक्ष सुरु आहेत.

८) महानिर्मिती ही कोणताही व्यावसायिक फायदा घेण्याच्या हेतूने प्रेरित नसून राज्यातील जनतेला रास्त व परवडणाऱ्या दरात वीजनिर्मिती करण्यासाठी प्रयत्नशील आहे. तथापि, असे निदर्शनास

येत आहे की, विजेच्या व्यापारातील सद्यस्थिती लक्षात घेता, कार्यक्षमतेच्या तसेच स्पर्धेच्या नांवाखाली महागड्या विजेची खरेदी व्हावी, यासाठी काही अनिष्ट प्रवृत्तींचे नियोजनबध्द प्रयत्न सुरु आहेत. सामाजिक उत्तरदायित्वाच्या भावनेने कार्यरत असलेल्या महानिर्मितीला जाणीवपूर्वक सतत अडचणीत आणण्याचे व तोट्यात ढकलण्याचे प्रयत्न होताना दिसत आहेत. याउलट काही खाजगी कंपन्यांकडून प्रति युनिट चार रुपयापेक्षा जास्त दराने वीज खरेदी करण्यासाठी नियामक आयोगाकडून मंजूरी देण्यात येत आहेत.

**महानिर्मितीच्या कामगिरीचे लेखापरीक्षण करताना मा. महालेखापाल (कॅग) यांनी वीज आयोगाने निर्धारित केलेले कामगिरीचे निकषच गृहित धरल्याचे दिसते. मा. महालेखापाल (कॅग) यांच्या अहवालात नमूद केलेली आकडेवारी या निकषांवर गृहित असल्याचे दिसते. तथापि, हे निकष हे वस्तुस्थितीला धरुन नसल्याने ते अवास्तव आहेत. याबाबत महानिर्मितीने वेळोवेळी आयोगाकडे तसेच अपिलीय प्राधिकरणाकडे दाद मागितलेली आहे. त्यामुळे एकूणच कामगिरीचे निकष व त्यानुसार मंजूर करण्यात आलेला खर्च आणि महानिर्मितीचे झालेले नुकसान याकडे एका वेगळ्या वास्तववादी दृष्टीकोनातून बघणे आवश्यक आहे.**